# ६. मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

**मनोरंजनाची आवश्यकता :-** निखळ मनोरंजनांमुळे व्यक्तीची निकोप वाढ होते. चाकोरीबद्ध जगण्यातील कंटाळा दूर करून मनाला चैतन्य, ताजेपणा, उत्साह, कार्यशक्ती मनोरंजनांमुळे मिळते. खेळ, छंद, सण, सोहळे, नाच-गाणी ही सर्व मनोरंजनाची साधने आहेत. मनोरंजनाचे १. कृतिशील २. अकृतिशील असे वर्गीकरण करता येते.

**कृतिशील रंजन** म्हणजे एखाद्या क्रियेमध्ये त्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष शारीरिक, मानसिक सहभाग होय. उदा :-हस्तव्यवसाय, खेळ.

**अकृतिशील रंजन** - खेळाचा सामना, चित्रपट पाहणे, संगीत ऐकणे यात व्यक्तीचा सहभाग नसतो. व्यक्ती फक्त प्रेक्षक असते.

**लोकनाट्य :-**

**१. कठपुतळ्यांचा प्रयोग:-** हा खेळ प्राचीन असावा- उदाहरणार्थ :-मोहेंजोदडो, ग्रीस येथे सापडलेल्या बाहुल्या. पंचतंत्र, महाभारतात या खेळाचा उल्लेख आहे. लाकूड, लोकर, कातडे इत्यादींचा वापर करून बाहुल्या बनवत. या खेळांच्या राजस्थानी व दक्षिणात्य अशा दोन पद्धती आहेत. हा प्रयोग करण्यासाठी सूत्रधाराचे कौशल्य महत्त्वाचे असते. लहानसा रंगमंच, प्रकाश-ध्वनी यांचा वापर यात करतात.

**२. दशावतारी नाटके:-** सुगी नंतर कोकण, गोवा मध्ये हे प्रयोग होतात. ही नाटके परमेश्वराच्या दहा अवतारांवर आधारित असतात. त्यातील पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा, परंपरागत असते. बहुतेक भाग पद्यमय असतो. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे असा असतो. १८ व्या शतकात शामजी नाईक काळे यांनी एक फंड स्थापन केला होता. विष्णुदास भावे यांनी या नाटकावर संस्करण करून पौराणिक नाटके सादर केली.

**३. भजन:** ईश्वराचे नामस्मरण आणि गुणवर्णन काव्यातून गाणे यास भजन असे म्हणतात. चक्री भजन व सोंगी भजन असे दोन प्रकार पडतात. चक्री भजनात चक्राकार फिरून भजन म्हणणे.

सोंगी भजनात देवभक्ताची भूमिका घेऊन संवाद स्वरूपात भजन म्हणणे. संत तुकारामांनी 'खंजिरी भजन' लोकप्रिय केले. संत मीराबाई, संत तुलसीदास, सूरदास आणि कबीर यांची भजने प्रसिद्ध आहेत. वारकरी संप्रदयाने नामस्मरणाचा प्रकार म्हणून भजनाला वैभव प्राप्त करून दिले आहे.

**४. कीर्तन :** कीर्तनाचे आदय प्रवर्तक नारदमुनी आहेत तर महाराष्ट्रात संत नामदेव हे आद्य कीर्तनकार होत. कीर्तनकारास हरिदास किंवा कथेकरी बुवा म्हणतात. कीर्तनकारास पोशाख, विद्वत्ता, वक्तृत्व, गायन, वादन, नृत्य, विनोद याकडे लक्ष द्यावे लागते. तो बहुश्रुत असावा लागतो. कीर्तन मंदिरात करतात.

**५. ललित:** नारदीय कीर्तन परंपरेत या प्रकारचा समावेश होतो. कोकण, गोवा या भागात याचे महत्त्व खूप आहे. ललिताच्या सादरीकरणामध्ये उत्सव देवतेसमोर मागणी मागतात. नाट्यप्रवेशप्रमाणे ललित सादर केले जाते. त्यात कृष्ण, रामकथा व भक्तांच्या कथा सांगतात.

**६. भारुड:** भारुडे अध्यात्मिक व नैतिक शिकवण देतात. ते प्रयोगशील असते. संत एकनाथांनी लोकशिक्षणासाठी भारुडे रचली.

**७. तमाशा:** 'तमाशा' हा शब्द पर्शियन असून चित्ताला प्रसन्नता देवारे दृश्य असा त्यांचा अर्थ आहे. यात विविध लोककलांचा मेळ असतो. त्याचे संगीत बारी व ढोलकीचा फड असे प्रकार आहेत. संगीत बारीमध्ये नृत्य संगीतावर भर असतो. वग, गण, गवळण इत्यादी सादर केले जातात.

**८. पोवाडा :** यात गद्य-पद्य यांचे मिश्रण असून तो आवेशयुक्त, स्फूर्तिदायक भाषण कथन केला जातो. यात पराक्रमाचे वर्णन केले जाते.

अज्ञानदास याचा अफजलखान वध विषयीचा पोवाडा व तुळशीदासाने रचलेला सिंहगडच्या लढाईचा पोवाडा हे प्रसिद्ध पोवाडे आहेत. ब्रिटिशांच्या काळातील पोवाडे, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात रचलेल्या पोवाड्यांनी महाराष्ट्र गाजवला.

**मराठी रंगभूमी :**

रंगभूमीवर ललितकला सादर केल्या जातात. ललित कलेमध्ये कलावंत, प्रेक्षक या दोहोंचा सहभाग आवश्यक असतो. नृत्य, संगीत याचा ही संबंध असतो. संवादाद्वारे व मूकाभिनय द्वारे नाटक सादर होते. तंजावरच्या भोसले राजवंशाने मराठी व दाक्षिणात्य भाषांमध्ये नाटकांना उत्तेजन दिले. त्या राजवंशातील राजांनी स्वतः नाटके लिहिली. विष्णूदास भावे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून ओळखले जातात. त्यांनी विनोदी पद्धतीने सामाजिक विषय सादर केले.

सुरुवातीच्या नाटकांच्या संहिता लिखित स्वरूपात नसत. त्यातील गीते लिहिलेली असली तरी गद्य संवाद उत्स्फूर्त स्वरुपाचे असत. वि. ज. कीर्तने यांनी १८६१ साली लिहलेले ‘थोरले माधवराव पेशवे’ हे पहिले मुद्रित स्वरूपातील नाटक. या नाटकामुळे अशा नाटकांची नवी परंपरा सुरू झाली. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्रात ख्याल संगीत रुजवले. संगीत रंगभूमीचा उद्य होऊन किर्लोस्कर मंडळी या नाटक कंपनीची संगीत नाटके लोकप्रिय झाली .

अण्णासाहेब किर्लोस्करांचे : ‘संगीत शाकुंतल’ नाटक गाजले.

गोविंद बल्लाळ देवल : ‘संगीत शारदा’, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : ‘मूकनायक’ , कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर : ‘संगीत मानापमान’ , राम गणेश गडकरी : ‘एकच प्याला’ ही नाटके खूप गाजली.

आचार्य अत्रे, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, विश्राम बेडेकर इ. नाटककारांनी विविध विषयावर नाटके लिहिली. गणपतराव जोशी, बालगंधर्व, बोडसे इ. कलाकार झाले.

**भारतीय चित्रपट सृष्टी :**

चित्रपटात कलात्मकता आणि तंत्रज्ञान यांचा संगम असतो. प्रथम मुकपट नंतर बोलपट आले. महाराष्ट्राला भारतीय चित्रपटाची जननी असे म्हणतात. भारतीय चित्रपटाच्या विकासात पितळे, पटवर्धन कुटुंबीय, हरिश्चंद्र भाटवडेकर यांचे योगदान आहे. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी राजा हरिश्चंद्र हा चित्रपट प्रदर्शित केला. प्रभात कंपनीचा रामशास्त्री चित्रपट गाजला. मराठी, हिंदी भाषेमध्ये अनेक ऐतिहासिक चित्रपट बनविले गेले. बॉम्बे टॉकीज, फिल्मीस्थान, राजकुमार प्रॉडक्शन, आर. के. स्टुडिओज इत्यादी कंपन्यांनी चित्रपट निर्मिती केली.

**मनोरंजन क्षेत्रातील व्यवसाय संधी :**

रंगभूमी, चित्रपट क्षेत्रामध्ये इतिहासाच्या विद्‌यार्थ्यांना अनेक संधी आहेत.

**नाटक** अ) केशभूशा, वेशभूषा, रंगभूषा आणि नेपथ्य अचूक असण्यासाठी संबंधित ऐतिहासिक काळातील चित्रकला, स्थापत्य, शिल्पकला या विषयाचा सखोल अभ्यास जाणणाऱ्या लोकांना कला दिग्दर्शनाचे नियोजन करता येते व सल्लागार म्हणून काम करता येते.

ब) भाषा संस्कृतीच्या इतिहासाची जाणकार म्हणून लेखकांना सल्लागार म्हणून गरज पडते. तसेच संवाद लेखनाच्या प्रक्रियेत त्यांची गरज लागते.

**चित्रपट :** अ)चित्रपटातील कथेशी संबंधित वातावरण निर्मिती, पात्रांच्या केश-वेषभूषा इत्यादी नियोजन करण्यासाठी कला दिग्दर्शकांना, इतिहासाचे जाणकार सल्लागार म्हणून मदत करतात.

ब)चित्रपटाच्या संवाद लेखनासाठी भाषा आणि संस्कृती जाणकरांची आवश्यकता असते.